# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः13.04.2026** **वारः सोमवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत नारी शक्ती वंदन संमेलनाला संबोधित करणार
2. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून गुजरात आणि महाराष्ट्राच्या चार दिवसांच्या दौऱ्यावर
3. अमेरिका आणि इराण यांच्यातली चर्चा निष्फळ ठरल्याने पश्चिम आशियातील संघर्षाला नवं वळण; होर्मुझच्या सामुद्रधुनीत जहाजांची वाहतूक रोखण्याचा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा इशारा आणि
4. ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या पार्थिव देहावर आज मुंबईत शासकीय इतमामात होणार अंत्यसंस्कार

**<u>पंतप्रधान-नारीशक्ती</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत नारी शक्ती वंदन संमेलनाला संबोधित करणार आहेत. देशाच्या विकासाची दिशा ठरवण्यात महिलांचा सहभाग वाढवण्याची कटिबद्धता अधिक बळकट करण्यासाठी या राष्ट्रीय स्तरावरील संमेलनाचं आयोजन करण्यात आले आहे. निर्णय प्रक्रियेमध्ये महिलांना अधिक प्रतिनिधित्व मिळण्याचं महत्त्व या कार्यक्रमाद्वारे अधोरेखित होणार आहे. शिक्षण, विज्ञान, क्रीडा, उद्योजकता, प्रसारमाध्यमे, समाजकार्य आणि संस्कृती अशा विविध क्षेत्रांत कर्तृत्व गाजवणाऱ्या महिला या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. वर्ष 2047 पर्यंत भारताला एक विकसित राष्ट्र बनवण्याच्या प्रवासातील महिलांच्या भूमिकेवर या संमेलनात विशेष भर दिला जाणार आहे.

सप्टेंबर 2023 मध्ये, विधिमंडळांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व वाढवण्यासाठी संसदेनं 'नारी शक्ती वंदन अधिनियम' मंजूर केला. या अधिनियमानुसार, लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांसाठी एक-तृतीयांश जागा राखीव ठेवण्याची तरतूद करण्यात आली आहे. महिला आरक्षणाला गती देणाऱ्या विधेयकावर चर्चा करून ते संमत करण्यासाठी, या महिन्याच्या 16 तारखेपासून संसदेचे विशेष अधिवेशन होणार आहे.

**<u>महिला आरक्षण-रिजिजू</u>**

विधिमंडळातील महिला आरक्षण हे बहुप्रतीक्षित आश्वासन सरकारनं प्रत्यक्षात उतरवलं आहे असं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी म्हटलं आहे. रिजिजू यांनी वैयक्तिकरित्या सर्व पक्षांच्या नेत्यांना पत्र लिहून या विषयावर तातडीने पुढे जाण्याची गरज व्यक्त केली आहे. प्रक्रियेच्या नावाखाली अंमलबजावणीला विलंब करणे म्हणजे लाखो महिलांना मिळणाऱ्या न्यायाला विलंब करण्यासारखेच असल्याचं रिजिजू यांनी म्हटलं आहे.

**<u>राष्ट्रपती दौरा</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून गुजरात आणि महाराष्ट्र या राज्यांच्या चार दिवसांच्या दौऱ्यावर येत आहेत. एम्स राजकोटच्या पहिल्या दीक्षांत समारंभाला त्या आज उपस्थित राहणार आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त गांधीनगरमध्ये 'लोक भवन' इथं आयोजित 'सामाजिक समरसता महोत्सवा'मध्ये राष्ट्रपती उद्या सहभागी होतील तसंच गांधीनगर इथल्या 'राष्ट्रीय रक्षा विद्यापीठा'च्या पाचव्या दीक्षांत समारंभालाही त्या उपस्थित राहणार आहेत.

एम्स नागपूरच्या दुसऱ्या दीक्षांत समारंभाला त्या बुधवारी, 15 तारखेला उपस्थित राहतील; त्यानंतर, नागपूरच्या 'नॅशनल ॲकॅडमी ऑफ डायरेक्ट टॅक्सेस' मध्ये 'भारतीय महसूल सेवे'च्या 78 व्या तुकडीतील प्रशिक्षणार्थी

अधिकाऱ्यांच्या समारोप समारंभाला त्या उपस्थित राहतील. त्यानंतर 16 तारखेला, राष्ट्रपती वर्धा इथल्या 'महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठा'च्या सहाव्या दीक्षांत समारंभाला उपस्थित राहणार आहेत.

**जयशंकर**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांचा संयुक्त अरब अमीरातीचा दोन दिवसांचा दौरा आटोपला आहे. या दौऱ्यात त्यांनी संयुक्त अरब अमीरातीचे राष्ट्रपती शेख मोहम्मद-बिन-जायद-अल-नहयान यांची भेट घेतली. या बैठकीत ऊर्जा सहकार्य, व्यापारवृद्धी आणि व्यापक धोरणात्मक भागीदारी अधिक मजबूत करण्यावर चर्चा झाली. डॉ. जयशंकर यांनी यूएईमधील भारतीय समुदायाशीही संवाद साधला. वाढत्या प्रादेशिक तणावाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या सुरक्षेसाठी केंद्र सरकार करत असलेल्या प्रयत्नांची त्यांनी माहिती दिली.

**पश्चिम-आशिया**

अमेरिका आणि इराण यांच्यात पाकिस्तानमध्ये झालेली चर्चा निष्फळ ठरल्याने पश्चिम आशियातील संघर्षाने नवं वळण घेतलं आहे. दोन्ही देशांमध्ये पुढील चर्चा कधी होणार याबाबतही कोणतीही ठोस वेळापत्रक निश्चित करण्यात आलेलं नाही. होर्मुज सामुद्रधुनी इराणी नियंत्रणातून मुक्त करण्यासाठी अमेरिकेचं नौदल तत्काळ कारवाई सुरू करेल, असा इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे. इराणला शुल्क देणाऱ्या प्रत्येक जहाजाचा शोध घेऊन ते रोखण्याचे तसंच इराणने पाण्यात टाकलेल्या स्फोटक सुरंगांचं निकामी करण्याचे निर्देश आपण अमेरिकेच्या नौदलाला दिल्याचं ट्रम्प यांनी म्हटलं आहे. वाटाघाटी निष्फळ ठरण्यामागे अणुक्षेत्रातली इराणची महत्त्वाकांक्षा हेच मूळ कारण असल्याचंही ट्रम्प म्हणाले.

दरम्यान, होर्मुज सामुद्रधुनीजवळ कोणत्याही शत्रूराष्ट्राच्या लष्करी जहाजांची उपस्थिती हे संघर्षविरामाचं उल्लंघन मानलं जाईल आणि अशा जहाजांवर कारवाई केली जाईल अशा इशारा इराणने दिला आहे. हा जलमार्ग शांततापूर्ण व्यापारी वाहतुकीसाठी खुला राहिला पाहिजे, असंही इराणने स्पष्ट केलं आहे.

**आशा भोसले-निधन**

प्रख्यात अष्टपैलू गायिका आशा भोसले यांचं काल मुंबईतील रुग्णालयात निधन झालं. प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना शनिवारी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. त्या 92 वर्षांच्या होत्या. आशा भोसले यांचं पार्थिव लोअर परळ इथल्या त्यांच्या निवासस्थानी अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आलं असून आज संध्याकाळी चारच्या सुमारास शिवाजी पार्क स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिव देहावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. जवळपास आठ दशकांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत आशाताईंना अनेक प्रतिष्ठेच्या पुरस्कारांनी गौरवण्यात आलं. भारत सरकारचा पद्मविभूषण सन्मान, भारतीय चित्रपट सृष्टीतला मानाचा दादासाहेब फाळके पुरस्कार, महाराष्ट्र सरकारचा 'महाराष्ट्र भूषण' यासह अनेक प्रतिष्ठेच्या पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आलं होतं.

**आशा भोसले-निधन प्रतिक्रिया**

ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या जाण्यानं संगीत क्षेत्रातील एक सुवर्णयुग संपल्याची भावना देशभरातून व्यक्त होत आहे. विविध मान्यवरांनी आशा भोसले यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन्, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आशा भोसले यांच्या निधनाबद्दल तीव्र दु:ख व्यक्त केलं आहे.

केंद्रीय मंत्रीमंडळातील अनेक सदस्यांनी, कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांच्यासह महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांनीही आपल्या शोकभावना व्यक्त केल्या आहेत. भारतातील परदेशी राजदूतांनीही, आशा भोसले यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

आकाशवाणी पुणे केंद्राचे माजी उद्घोषक, संगीत अभ्यासक सिद्धार्थ बेंद्रे यांनी आशाताईबद्दल व्यक्त केलेल्या या हृद्य भावना.....

**आशा माधव भाव आशा भाई मुझे अंबर की एक पाक महाराष्ट्र भूषण भारत भूषण सुद्धा। नियत कौलदत्त चतुर के स्वामिनी तिथे संगीत एक घूमते जीवन सुंदर संगीतकार संगीत विभाज्य भाग या ना पिल प्रत्यक्ष अर्थ जीवंत दंत कथा प्रत्यक्ष पाहिली आ ब्रह्म पाहिली गीत कितना गा चुकी हूँ इस सुखी जग के लिए आज रोने दो मुझे पल एक अपने लिए हे पल कर एक कविता सुसली होती सप्टेंबर महीने। मोठी तिची सावली लता तिची माउली आते खूब लवली समस्त श्रोत्र वृंदा मस भावली मर्मबंधातली ठेव कायम हृदय जपली आशादायक गायकी नवरसात नाहली विश्व विक्रमी गायकी इगलों की निनादली त्रिवार अभिवादन त्रिवार अभिवादन फोर यूर सॉन्ग्स ओनली भारत स्वररत्न आशा भोसले याना विनम्र विनम्र अभिवादन।**

**<u>विधानसभा</u>**

पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकांच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. भारतीय जनता पक्षाचे वरिष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज बीरभूम आणि पश्चिम बर्धमान जिल्ह्यांमध्ये प्रचार दौरा करणार आहेत. बीरभूम जिल्ह्यातील सैंथिया आणि खैरासोल इथं ते जाहीर सभाही घेणार आहेत. तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षा ममता बॅनर्जी यांही आज राज्यभरात अनेक ठिकाणी प्रचार दौरा करणार आहेत. बीरभूम जिल्ह्यातील सूरी, पूर्व बर्धमान जिल्ह्यातील गाल्सी इथं त्या सभा घेणार आहेत.

तामिळनाडूमध्येही विधानसभा निवडणुकीच्या प्रचारानं वेग घेतला असून सर्वच पक्षांचे नेते जाहीर सभा, रोड शो आणि पदयात्रा अशा विविध माध्यमातून मतदारांना आकर्षित करत आहेत. भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी आज भाजपा कार्यकर्त्यांशी संवाद साधणार आहेत.

**<u>अमरनाथ यात्रा</u>**

वार्षिक अमरनाथ यात्रा यंदा 3 जुलै ते 28 ऑगस्ट दरम्यान होणार असल्याची घोषणा जम्मू आणि काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी काल समाजमध्यमावरून केली. ज्येष्ठ पौर्णिमेच्या निमित्ताने 29 जून रोजी भगवान शिवाची प्रथम पूजा होईल. या यात्रेसाठी 15 एप्रिलपासून ऑनलाइन आणि ऑफलाईन पद्धतीनं आगाऊ नोंदणी सुरू होईल.

**<u>बॅडमिंटन</u>**

आशियाई बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या आयुष शेट्टीला रौप्य पदकावर समाधान मानावं लागलं. चीनमध्ये काल झालेल्या अंतिम लढतीत आयुषला चीनच्या शी यु कि याच्याकडून 21-8, 21-10 अशा सलग दोन गेममध्ये पराभव स्वीकारावा लागला.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं,

# नमस्कार.